# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेस नोट** **दि. २४/०७/२०२३**

## एम.आय.डी.सी भोसरी पोलीसांनी एम.आय.डी.सी भोसरी परीसरातील रात्रीच्या वेळी घर फोडी करणाऱ्या चोरटयास केले जेरबंद

---

एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन हददीतील मरक्युरस वॉटर ट्रिटमेंट कंपनी डब्ल्यु १९४/बी, एस ब्लॉक एम.आय.डी.सी भोसरी पुणे या कंपनीमध्ये दि. १६/०३/२०२३ रोजी पहाटे ०३/०० वा. चे सुमारास अज्ञात चोरटयांनी कंपनीमध्ये प्रवेश करुन कंपनीतील मटेरिअल चोरी केलेबाबत **दि. १८/०७/२०२३ रोजी एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३०५/२०२३ भा.दं.वि. कलम ३८०,४५७,३४** प्रमाणे गुन्हा करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास करुन आरोपीना अटक करण्याबाबत मा.वरिष्ठांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना देवुन आरोपीचा शोध घेणेबाबत कळविले होते सदर सुचना प्रमाणे तपास पथकातील अधिकारी पोलीस उप निरीक्षक एस.ए.चव्हाण व अंमलदार यांनी घटनास्थळाचे आजुबाजुचे सी.सी.टी.व्ही ची पहाणी करुन आरोपीबाबत गोपनिय बातमीदारामार्फत माहीती घेतली असता सदर गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी **अमिर ऊर्फ चप्या हुसेन शेख, वय ३० वर्षे, रा. लिंक रोड, पत्रा शेड झोपडपट्टी, चिंचवड पुणे सध्या रा. बालाजीनगर झोपडपट्टी, एम.आय.डी.सी भोसरी पुणे** याने केले बाबत **पोलीस शिपाई खेसे व पोलीस शिपाई शेप** यांना खात्रीशीर माहीती मिळाल्याने सदर आरोपीचा शोध घेवुन त्यास दि. १९/०७/२०२३ रोजी ताब्यात घेवुन सदर गुन्हयात अटक करुन त्याचेकडे तपासी अधिकारी **पोलीस उप निरीक्षक एस. ए.चव्हाण** यांनी तपास केला असता सदरचा गुन्हा हा त्याने त्याचे दोन विधीसंघर्षीत साथीदारांसह केला असल्याचे सांगितले अटक आरोपीची पोलीस कोठडी घेवुन त्याचेकडुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेला **१,५०,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल व एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं. १८३/२०२३ भा.दं.वि. कलम ३८०,४५७ प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली **१२,०००/- रुपये** किंमतीची पॉलीकॅब वायर असा **एकुण १,६२,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आली आहे. सदर आरोपीने **एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३०५/२०२३ भा.दं.वि.कलम ३८०,४५७, ३४ व गु.र.नं. १८३/ २०२३ भा.दं.वि. कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.**

सदरची कारवाई **मा.श्री विनयकुमार चौबे** सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, **मा. श्री डॉ. संजय शिंदे** सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, **मा. श्री वसंत परदेशी** सो. अप्पर

पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, **मा.श्री विवेक पाटील** सो. पोलीस उपायुक्त, परिमंडळ १, पिंपरी चिंचवड, **श्री सतिश कसबे** सो. सहा. पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार **राजेंद्र निकाळजे** वरिष्ठ पोलीस निरीक्षक**, सचिन चव्हाण,** पोलीस उप निरीक्षक **पोलीस अंमलदार** चंद्रकांत गवारी, संजय जरे, स्वप्नील शेलार, गणेश बोऱ्हाडे, शरद गांधिले, राहुल लोखंडे, भागवत शेप, नितीन खेसे, अनिल जोशी, विशाल काळे, महीला पोलीस अंमलदार उषा होले यांनी मिळुन केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सचिन चव्हाण, एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन हे करत आहेत.

**(विवेक पाटील)**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड**